# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - संगीत
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. जयश्री संकलेचा

देवाधिदेव महादेवाने केला संगीताचा शुभारंभ
अनुसरून त्यांचा मार्ग आपणही करू संगीताने जीवनाचा आरंभ
ज्याच्या नावातच दडलं आहे मनाचं गीत
त्यालाच म्हणतात खरं हृदयस्पर्शी संगीत
या ईश्वरीय देणगीचे आहे अनन्यसाधारण महत्त्व
सर्व कलांमध्ये प्राप्त केले संगीतकलेने सर्वश्रेष्ठत्व
सूर आणि ताल जेव्हा येतात जळून
हृदय स्पर्श करते तेव्हा संगीत खुलुन
शब्द होतात बघा कधी अयशस्वी
शक्ती संगीताची बघा नेहमीच होते यशस्वी
मनाची भाषा सहज कळते मनाला
जीवाची ओढ लावते या जीवाला
प्रेमाचे रेशीम धागे मजबूत करतो संगीत
प्रत्येक क्षणाला लयबद्ध करून प्रेम वाढवितो संगीत
जीवनाच्या प्रत्येक क्रियेला सुंदर बनवितो संगीत
अंतःकरणाच्या भाषेला सुर देतो संगीत
साधुसंतानाही जीवनाचा परमानंद देतो संगीत
आत्मशांती मिळवण्याचे एकमेव साधन आहे संगीत
संगीताने खुलतात प्रत्येक हृदयाचे द्‌वार
संगीतच आहे आनंदी जीवनाचा आधार
प्रत्येक प्रसंगामध्ये संगीत कधी साथ सोडत नाही
कडू असो वा गोड संगीत हृदयात उतरल्याशिवाय रहात नाही
अंगाईच्या संगीताने बाल्यावस्था गेली मजेदार
प्रेमाच्या पुरात तरुणाई बहरली डौलदार
अध्यात्माच्या संगीताने वृद्‌धावस्थेला दिला आधार
संगीतानेच केले कुण्या जीवनाचे स्वप्न साकार
नेहमीच राहतील संगीत कलेचे आपणावर उपकार
संगीतकलेचा करू बहुमान, हेच आपल्या जीवनाचे सार

Anahat Music Therapy